नियमित फौजदारी खटला **नं.** २७५/**२०१४**

निशाणी क्र**.**५४

**(**साक्षीदारास व्ही.सी**.** द्वारे हजर केले**)**

## <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांचा जबाब</u>

मी, शपथेवर निवेदन करतो की,

माझे नाव - आर.पी. नाईकवाडी

माझे वय- ६८ वर्षे व्यवसाय – सेवानिवृत्त

राहणार - तेर, ता., जि. धाराशिव, .

<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहा**.** सरकारी अभियोक्ता श्री**.** अयाजोद्दीन रियाजोद्दीन यांचेकडुन</u>

सन २०१४ मध्ये मी पोलीस स्टेशन, कळंब येथे ए.एस.आय. म्हणुन कार्यरत होतो. गु.र.क्र.८९/२०१४ या प्रकरणाचा तपास मी केला आहे. तपासावेळी माझ्याकडे घटनास्थळ पंचनामा, अटक पंचनामा व फिर्याद देण्यात आली होती. तपासादरम्यान मी अटकेची नोंद घेतली. त्यानंतर साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. त्यानंतर, आरोपीस न्यायालयात हजर केले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. जप्त केलेली तलवार पाहील्यास मी ओळखु शकतो. आता मला सदरील तलवार दाखविण्यात आली, ती तीच आहे. आरोपीस पाहील्यास मी ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री**.** बी**.**बी**.** कोळपे यांचेकडुन</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे तपास येण्यापुर्वीच पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनामा केला नसल्यामुळे मला पंचनाम्यातील पंचांची नावे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, तलवार माझ्यासमक्ष जप्त केली नव्हती. स्टेशन डायरीला माझी नोंद केल्याचे मला माहीती

नाही. मी साक्षीदारांचे आधारकार्ड घेतले नव्हते, ते सर्व पोलीस खात्याचे होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस खात्यातील साक्षीदारांव्यतिरक्त इतर साक्षीदारांचे तपास टिपण मी नोंदविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी तपास टिपण नोंदविले.

३. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्या दिवशी माझा अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी दोन महिने दवाखान्यामध्ये होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे काय तपास केला हे मला समजले नाही. हे मला माहीत नाही की, आरोपी दारु पितो किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी दारु पिऊन आठवडी बाजारात झोपलेला असल्यामुळे आम्ही त्याला पोलीस स्टेशनला घेऊन आलो. हे म्हणणे खरे नाही की, जप्त तलवार भंगारमधुन जप्त केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

NITIN MAHADEO REDDY

Digitally signed by NITIN MAHADEO REDDY
Date: 2026.06.04 15:51:39 +0530

दिनांक- ०४/०६/२०२६

(एन**.** एम**.** रेड्डी)
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
कळंब (कोर्ट क्र. २)